सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
# अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि. पुणे - ४१२४०५.

दुरध्वनी क्रं. (०२१३३) २३०५८२ E-mail : gcoeara@gmail.com Web-Site : www.gcoeara.ac.in

(स्वयंचल व यंत्र अभियांत्रिकी अभ्यासक्रम एनबीए, नवी दिल्ली मानांकित)

जा.क्र.शाअवसंमअ/विवि/२०२३/2033 दिनांक : 06 MAY 2023

## -: विद्यार्थ्यासाठी महत्वाची सुचना :-

**संदर्भ-** सा.फु.पुणे विद्यापीठ यांचे दि. ०६/०५/२०२३ रोजीचे परिक्षा अर्ज भरण्याबाबत प्रदर्शित झालेले वेळापत्रक

महाविद्यालयातील चालू शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रथम वर्षात (FE) प्रवेशित व Backlog / YD असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील एप्रिल/मे २०२३ व्दितीय सत्रातील परीक्षा अर्ज **दिनांक ०६/०५/२०२३** पासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून भरून घेणे सुरू झाले आहे. तरी विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने परीक्षा अर्ज भरण्यापुर्वी, संबंधित विभागातील शिक्षकांकडून कोणते ऑडीट कोर्स /Special /Elective/Honors इत्यादी विषय लागू आहेत, याबाबत प्रथमत: चौकशी करावी. मगच ऑनलाईन परीक्षा अर्ज भरून परीक्षा अर्जाची प्रिंट आउट काढून परीक्षा अर्जावर नमुद असलेले परीक्षा शुल्क **SBI Collect** वर ऑनलाईन पध्दतीने भरून शुल्क भरलेली पावतीची प्रिंट तसेच मागील /सत्राच्या / वर्षाच्या सर्व गुणपत्रिका परीक्षा अर्जासोबत जोडून, विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्जात नमुद केलेला (TH/OR/PR,Audit Course/Elective/Honors subject) बरोबर असल्याची संबंधित विभागातील नेमुन दिलेल्या शिक्षकांकडून खातरजमा करावी व त्यावर संबंधित शिक्षकाची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर कार्यालयातील विद्यार्थी विभागात स्वत: जावून परीक्षा अर्जाची पडताळणी केल्यानंतर रोखपालकडून पेमेंट रिसीप्ट चेक करून सदर अर्ज डि. पी. यू. विभागात **दिनांक १२/०५/२०२३** रोजीपर्यंत जमा करणे आवश्यक आहे.

तरी विद्यार्थ्यांनी त्वरीत ऑनलाईन पध्दतीने परीक्षा अर्ज भरून **दिनांक १२/०५/२०२३** रोजीपर्यंत सादर करावे. अन्यथा भविष्यात होणा-या शैक्षणिक व आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार असेल, याची सर्व विद्यार्थ्यांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.

06-5-23

(डॉ. दि. रा. पानगव्हाणे)
प्राचार्य,
शासकिय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी खुर्द ता. आंबेगाव जि.पुणे.

प्रत-१. विभागप्रमुख-अणुविद्युत/उपकरणीकरण/संगणक/स्वयंचल/स्थापत्य/यंत्र/उपयोजित वि./कर्मशाळा त्यांनी ही सुचना आपल्या विभागातील विद्यार्थ्यांच्या What,s App ग्रुप वर त्वरीत पाठवावी.
२. डि. पी. यु. विभाग यांनी सदर सुचना सर्व विभागप्रमुखांना मेल करावी.
३. सर्वसाधारण सुचना फलक. ४. रोखपाल ५. डी. पी. यु.